**११) साहित्यिक व संशोधक :-** वि.रा.शिंदे हे थोर साहित्यिक व तत्त्वचिंतक आणि संशोधक होते. त्यांनी तरूण वयातच कादंबरी लिहिण्याचा प्रयत्न केला होता. परंतु त्यांना कामाच्या व्यापामूळे कादंबरीचे लेखन करता आले नाही. त्यांनी कवणे. रचण्याचे काम केले. त्यांनी रचलेला म. फुल्यांचा पोवाडा प्रसिद्ध आहे. ते रोजनिशी लिहित असत. आपण केलेल्या दररोजच्या कामाचा वृत्तांत त्यामध्ये असे ही रोजनिशी पुस्तक रूपाने प्रकाशित झाली आहे. कारागृहात असतानाच त्यांनी माझ्या आठवणी व अनुभव या आत्मचरित्रक ग्रंथाचे लेखन केले. त्यांनी वेगवेगळ्या विषयावर लेख लिहिले. हे लेख आज पुस्तक रूपाने प्रसिद्ध झाले आहेत. वि.रा.शिंदे यांनी 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न' हा प्रबंध लिहिला. हा प्रबंध नागपूर येथील नव भारत ग्रंथालयाने इ.स. १९३३ मध्ये प्रकाशित केला. इ.स. १९३५ मध्ये बडोदा येथे साहित्य सम्मेलन भरले होते. या सम्मेलनात वि.रा.शिंदे नी तत्त्वज्ञान शाखेचे अध्यक्षपद भुषविले होते. वि.रा.शिंदेनी केलेले सामाजिक कार्य अत्यंत महत्त्वाचे होते. त्यांच्या या कार्याची नोंद बडोदा सरकारने घेतली. त्यांना इ.स. १९३२ ते ३३ साली दलितमित्र पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला.

**१२) आजार आणि निधन :-** वि.रा.शिंदे नी समाजसुधारणा अस्पृश्यता निर्मुलन आणि उपेक्षित समाजाचे जीवनमान उंचावण्यासाठी आयुष्यभर कार्य केले. त्यासाठी त्यांनी महाराष्ट्र भर ब्रम्हंती केली. जनसभा घेतल्या, समाज प्रबोधन केले. परिणामी इ.स. १९३५ पासून त्यांना अनेक रोगांनी पछाडले. त्यांचे शरीर थकले. त्यांना प्रवास व कष्ट झेपेनासे झाले. त्यातच त्यांना गोवर नावाचा आजार झाला. हा आजार प्रचंड वेदनामय असल्याने त्याचा परिणाम त्यांच्या शरीरावर झाला. इ.स. १९४३ साली त्यांना अर्धांगवायुचा झटका आला व त्यांचे शरीर लुळे पडले. त्यामध्येच त्यांचा २ जानेवारी १९४४ रोजी त्यांचे निधन झाले. परंतु त्यांचे विचार आणि कार्यामुळे ते अजरामर झाले.

असे. नवस केलेल्या जोडप्याला झालेले पहिले मुल खंडोबाला वाहिले जात असे. अशा मुलास 'वाघ्या' व मुलीस 'मुरळी' म्हटले जात असे. वाघ्याच्या जीवनात फारसा फरक पडत नसे. मुलीला मात्र देवाची दासी म्हणून अजन्म रहावे लागत असे. तिला विवाह करता येत नव्हता. कर्नाटकात संवरदेवीच्या देवीला मुरळी सोडण्याची धार्मीक परंपरा होती. मुरूळी अर्थात देवदासीवर जुलुम आणि अत्याचार केले जात असे.प्रामुख्याने मुरळी या वयाने लहान असून त्या अस्पृश्य समाजातील असत. २५ एप्रिल १९१० रोजी विठ्ठल रामजी शिंदेनी देवदासी या समाज घातक प्रथेवर एक सभा घेतली. त्याचवेळी मुरळी करण्यासाठी घेऊन जात असणाऱ्या एका लहान मुलीची सुटका केली ही प्रथा बंद करण्यासाठी एक कार्यकर्त्यांचा संघ उभारला व कार्यकर्त्यांनी मुरळी अर्थात देवदासी या प्रथेस सुधारणा करून त्यांच्यात आनंद निर्माण करण्याचा प्रयत्न केला. तर कांही कार्यकर्त्यांनी मुरळी झालेल्या मुलीबरोबर लग्न करून समाजात एक आदर्श निर्माण केला. स्त्री अत्याचार मुक्तीची परिवर्तनवादी चळवळ म्हणून विठ्ठल रा. शिंदेच्या कार्याकडे पाहिले जाते. विठ्ठल रा. शिंदे यांनी केवळ स्त्रि अत्याचाराच्या मुक्तीसाठीच प्रयत्न केले नाहीत तर शेतकरी व अस्पृश्यना सभा सम्मेलनातून आपली भूमिकास्पष्ट मांडली मुलींना शिक्षणाची सक्ती करावी यासाठी त्यांचे प्रयत्न महत्त्वाचे ठरतात.

**१०) असहकार आंदोलन व विठ्ठल रामजी शिंदे (१९२०) :-** वि.रा.शिंदे हे लोक मान्य टिळक आणि म. गांधींचे पुरस्कर्ते होते. १ ऑगस्ट १९२० रोजी लोकमान्य टिळकांचे निधन झाल्यानंतर म. गांधीकडे राष्ट्रीय काँग्रेसचे नेतृत्व आले. राष्ट्रीय काँग्रेसच्या आदेशानुसार म. गांधीजीनी इ.स. १९२० मध्ये ब्रिटिश सरकारच्या विरोधात असहकार आंदोलन सुरू केले. या आंदोलनात विठ्ठल रा. शिंदे यांनी सहभाग घेऊन पुणे येथे नेतृत्व केले. त्यामूळे ब्रिटिश सरकारने त्यांना अटक केले. त्यांनी येरवडा येथील कारागृहात ६ महिने शिक्षा भोगली. कारागृहात निकृष्ट दर्जाचे अन्न दिले जात होते. तसेच त्यांच्या कडून कठीण परिश्रम करून घेतले जात होते. त्यामुळे त्यांच्या शरीरावर त्याचा परिणाम झाला. परतु त्यांनी ब्रिटिश सरकारपुढे शरणागती न पत्करता कारावास सहन केला आणि आपल्या ध्येयाशी ते एकनिष्ठ राहिले.

दक्षिण त्रवणकोर संस्थानात व्हायकोन येथे इ.स. १९२४ साली मोठा सत्याग्रह करण्यात आला व्हायकोन या गावात अस्पृश्य लोकावर फार बंधने होती. तेथील मंदिरात जाण्या-येण्याच्या रस्त्यावर अस्पृश्य लोकांनाफिरण्याची मनाई होती. या उलट मुसलमान ख्रिश्चन इ. कोणत्याही परधर्मीय लोकांना मंदिराच्या वट्यावर फिरण्याची मोकळीक होती. एवढेच नव्हे तर मंदिराच्या मंडपात, बाह्य मंडपात अशा लोकांना प्रतिष्ठितपणे नेण्यात येते असे हा अन्या नष्ट करण्यासाठी व्हायकोम येथे सत्याग्रह करण्यात आला. हा विषय प्रामुख्याने धार्मिक व अस्पृश्य निर्मुलनाचा होता. इंग्रज सरकार भारतातील धार्मिक बाबीमध्ये लक्ष घालत नसल्याने व्हायकोम येथे अस्पृश्यतेसारख्या अनिष्ठ प्रथा चालु राहिल्या. विठ्ठल शिंद्यांनी या धोरणाचा निषेध केला.

**८) व्हायकोम येथील अनिष्ठ प्रथा व शिंद्यांचे कार्य :-** व्हायकोम येथे अनेक सामाजिक प्रथा होत्या. स्त्रियांना अर्धनग्न रहावे लागत असे. बिट्या या अस्पृश्य जातीचा शिवप्रसाद हा एक साधु होता. या साधुबरोबर विठ्ठल रामजी शिंदे यांनी मंदिर प्रवेशासाठी सत्याग्रह केला. या सत्याग्रहात साधु शिवप्रसाद यांनामंदिर प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली. याबाबत विठ्ठल शिंदे यांनी मंदिराचे व्यवस्थापक व संस्थानाच्या दिवाणाकडे दाद मागितली. तसेच सत्याग्रहात भाषण करून अस्पृश्याना मंदिर प्रवेश दिला जावा असे त्याने प्रतिपादन केले. याचवेळी संस्थानच्या दिवाणाचा निरोप आला की, साधु शिवप्रसाद हे पुर्वआश्रमीचे अस्पृश्य आहेत, तेंव्हा त्यांनी मी हिंदू नाही असे जाहीर करावे. परंतु हा तोडगा विठ्ठल शिंदे व साधु शिवप्रसाद यांनी मान्य केला नाही. यानतर व्हायकोन येथे मोठी सभा घेऊन या सभेत विठ्ठल शिंद्यांनी लोकांना मंदिर प्रवेशासाठी जागृत करण्याचे आव्हान केले. विठ्ठल शिंदेच्या या सत्याग्रहामुळे त्याचे ब्राम्हो समाजाचे आचार्यपद काढून घेण्यात आले.

**९) मुरळी प्रतिबंधक सभा (१९१०) :-** विठ्ठल रामजी शिंदेनी अनेक सामाजिक अनिष्ट रूढी व परंपरा विरोधी दंड थोपटले होते. महाराष्ट्रात कर्नाटक प्रदेशात खंडोबा नावाची देवता समाजप्रिय व लोकप्रसिद्ध होती. आपल्याला मुल होण्यासाठी खंडोबाला नवस करण्याची प्रथा समाजात प्रचलित होती. "पहिले मुल होईल ते खंडोबाला वाहिले जाई" असा नवस केला जात

प्राप्त करून दिले त्यांनी इ.स. १९१८ मध्ये मुंबई मध्ये २३ ते २५ मार्च दरम्यान अखिल भारतीय अस्पृश्यता निवारण परिषद आयोजित केली. या परिषदेचे अध्यक्ष बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड होते. या परिषदेमध्ये बॅरिस्टर जयकर यांनी असा ठराव मांडला कि निकृष्ट वर्गावर लादलेले अस्पृश्यता ताबडतोब काढून टाकावी आणि अस्पृश्यता निर्मुलनासाठी प्रत्येक प्रांतातील वजनदार, प्रतिष्ठित, प्रभावी कार्यकर्ते व पुढाऱ्यांनी अस्पृश्यता निवारण्याच्या संदर्भात एक जाहिरनामा काढून शाळा, दवाखाने, न्यायालये या सार्वजनिक संस्था आणि विहिर, कालवे, धरणे, तलाव, नगर सार्वजनिक पाणवठे, सार्वजनिक करमणुकीचे ठीकाणे व देवालय या ठिकाणी  अस्पृश्याना मोकळीक करून द्यावी. असे या परिषदेचे मत आहे. हा ठराव प्राप्त करण्यात आला. या परिषदेला बाळ गंगाधर टिळक उपस्थित होते.

**६) अखिल भारतीय अस्पृश्यता निवारण परिषद नागपूर (१९२०):-** म.गांधीच्या अध्यक्षतेखाली २८ डिसेंबर १९२० रोजी नागपूर येथे अखिल भारतीय अस्पृश्यता निवारण परिषद झाली. या परिषदेला मोतीलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल, व  सरोजिनी नायडू हे उपस्थित होते. या परिषदेत पुढील २ ठराव पास करण्यात आले.

१) अस्पृश्य लोकांची हिंदूधर्म व हिंदू राष्टावरील एकनिष्ठा लक्षात घेऊन त्यांच्यावर असलेले नागरिकत्वाचे आणि धार्मिक प्रकारचे सर्व प्रतिबंध एकदम काढून टाकावेत.

२) हिंदुस्थानातील उद्योगधंद्याचा पुर्ण विकासहोण्यासाठी अस्पृश्य लोकांच्या मार्गात आजपर्यंत स्वतंत्रपणे उद्योगाची निवड करण्यास आणि उद्योग करण्यात जी अडथळे येतात ते सर्व नष्ट करून त्यांच्यात स्वतः निर्णय घेण्याची कृती विकसित व्हावी थोडक्यात अस्पृश्य लोकांना सवलती देऊन सहकार्य करण्यात यावे.

**७) व्हायकोम सत्याग्रह (१९२४) :-** विठ्ठल रामजी शिंदे इ.स. १९२० मध्ये डिप्रेस्ट क्लासच्या कार्यातून निवृत्त झाले. त्यानंतर ते ब्राम्हो समाजाचे आचार्य म्हणून दक्षिणेत गेले. मंगलूर येथे हिंदू पद्धतीने किर्तन करीत असत. याच किर्तनाला हिदू, मुसलमान, ख्रिश्चन लोक हजर राहत असत.

पैशाची आवश्यकता असते. मिशनच्या सभासदांनी रु.फंड, कापड फड इ. सारख्या अनेक सामुदायिक योजना राबविल्या. विठ्ठल रामजी शिंदे हे सुरूवाती पासूनच सरकार, संस्थानीक व्यापाराकडून देणग्या घेत असत. मिशन मार्फत अनेक लघुउद्योग सुरू केले.मिशनच्या प्रेरकशाखेत पुस्तकबांधणी व शिक्षण कला महाबळेश्वर येथील शाखेत दोरखंड व वेताच्या टोपल्या, विणण्याचे काम चालत असे, मिशनने सुरू केलेल्या उद्योग शाळा शिवणकला, सुतारकाम, चित्रकला व रंगकाम इ. विषय शिकविले जात असत. असे कार्य करत असताना प्रार्थना समाज व विठ्ठल रामजी शिंदे यांच्यामध्ये कुरबुरी झाली. म्हणून विठ्ठल रामजी शिंदे यांनी प्रार्थना समाजाचे प्रचारक पद सोडून दिले. त्यांना मिळणारे वेतन बंद केले. परिणामी विठ्ठल शिंदे आर्थिक दृष्ट्या डबघाईस आले. परंतु त्यांनी हाती घेतलेले कार्य सोडले नाही. आर्थिक कठिण परिस्थितीचा सामना करत असताना इ.स. १९१० मध्ये त्यांचे आई-वडील मरण पावले.

**४) शाळा आणि वस्तीगृहे :-** डिप्रेस्ट क्लास मिशनने अनेक शाळा आणि वस्तीगृहे सुरू केली होती. इ.स. १९१२ मध्ये विठ्ठल रामजी शिंदे कायम वास्तव्यासाठी पुणे येथे आले. पुणे येथे मिशनच्या १४ ठिकाणी २३ शाळा, ५ वस्तीगृह व १२ इतर संस्था होत्या मिशनमध्ये ५ प्रचारक होते. आणि मिशनच्या शाळेत ५५ शिक्षक होते. पुणे शाखेचा अहवाल पाहुन श्रीमंत तुकोजी महाराज होळकरांनी शिंदेना २०,००० रु. देणगी दिली व पुणे येथील मुक्कामाच्या ठिकाणचे ७ हेक्टर जमीन पुणे नगरपरिषदेने ९९ वर्षाच्या किरायाने मिशनच्या स्वाधीन केले. अशा प्रकारे विठ्ठल रामजी शिंदे यांनी सुरू केलेला डिप्रेस्ट क्लास मिशनला समाजात आदराचे स्थान प्राप्त झाले. विठ्ठल शिंद्याचे यश आणि त्याने सुरू केलेले सामाजिक कार्य काही मंडळीना सहन झाले नाही. या मंडळीनी अगदी खालच्या पायरीला जाऊन त्यांच्यावर आरोप केले. त्यामूळे १९२३मध्ये विठ्ठल रामजी शिंदे यांनी कंटाळून मिशनचे दायीत्व ज्या समाजासाठी ते कार्य करीत होते त्यांच्याकडे सोपवून ते मिशनच्या कार्यातून कायमचे मुक्त झाले.

**५) भारतीय अस्पृश्यता निवारण परिषद :-** (१९१८) महर्षी विठ्ठल शिंद्यानी इ.स. १९१७ मध्ये अस्पृश्यता निर्मुलन कार्याला राजकीय स्वरूप

रामजी शिंदे उपस्थित होते. तेथील कार्यक्रमाची मार्गदर्शन पत्रिका पाहून त्यांची पुढील दिशाच स्पष्ट झाली. आपल्या जीवित कार्याची रुपरेषा ठरवून त्याचवेळी त्यांनी अस्पृश्यता निर्मुलनाचे कार्य करण्याचा निश्चय केला.

**१) डिप्रेस्ट क्लास मिशन (इ.स. १९०६) :-**विठ्ठल रामजी शिंदे यांनी अस्पृश्याच्या हालअपेष्ठा व जुलूम जबरदस्ती आणि त्यांच्या वरील अन्याय दूर करण्यासाठी ८ ऑक्टोबर १९०६ रोजी मुंबई येथे डिप्रेस्ट क्लास मिशनची स्थापना केली. अस्पृश्यता निवारण करण्याचे कार्य आयुष्यभर करीन असा निश्चय केल्यानंतर विठ्ठल शिंदे मुंबईला गेले व त्या ठिकाणी त्यांनी प्रार्थना समाजाचे पदाधिकारी व आपल्या सहकार्याबरोबर अस्पृश्यता निवारण करण्यावर सविस्तर चर्चा केली . विठ्ठल रामजी शिंदेच्या या भूमिकेमूळे प्रार्थना समाजाने सुद्धा अस्पृश्यता निर्मुलनासाठी व अस्पृश्याच्या उद्धारासाठी कार्य निश्चित केले. मुंबई येथे एलफिस्टन येथे डिप्रेस्ट क्लासची पहिली शाळा स्थापन करण्यात आली. थोडक्यात डिप्रेस्ट क्लास मिशनच्या कार्याच्या माध्यमातून प्रथम अस्पृश्यता निवारण व दलिताचा उद्धार करण्याचे कार्य सुरू झाले.

**२) डिप्रेस्ट क्लास मिशनचे कार्य :-** डिप्रेस्ट क्लास मिशनच्या माध्यमातून प्रा. शाळा वस्तीगृह मोफत दवाखाने इ. कार्य सुरू झाले. मिशनच्या कार्याचा व्याप वाढल्यामुळे विठ्ठल रामजी शिंदे यांना कार्यकर्त्यांची आवश्यकता भासू लागली. त्यांनी अस्पृश्यता निवारण कार्यात भावनिक तळमळ असणारे कार्यकर्ते शोधण्यास सुरूवात केली व ही सुरूवात त्यांनी आपल्या घरापासूनच केली. त्यांची बहीण पनवेल येथे मुलीच्या शाळेत मुख्याध्यापिका होती तिने नौकरीचा राजीनामा देऊन मिशनने हाती घेतलेले कार्य सूरू केले. त्यांच्या आई-वडीलांनी जमखंडी सोडून मुंबईला आले त्यांनी आपल्या मुलांनी सुरू केलल्या कार्यात भाग घेतला. १८ ऑक्टोबर १९०९ रोजी मिशनचा ३ वर्धापन दिन मुंबईला टाऊन हॉलमध्ये साजरा करण्यात आला.या वेळी बडोद्याचे म. सयाजीराव गायकवाड, सर नारायण, चंदारकर व नारायण गोखले इ. मान्यवर उपस्थित होते. याच वेळी सयाजीराव गायकवाड यांनी या मिशनला २००० रु. देणगी जाहीर केली.

**३) मिशनच्या योजना :-** या अस्पृश्यता निवारण या कार्यासाठी

प्रार्थना समाजाच्या मंदिरात प्रार्थनेला गेले. प्रार्थना समाजातील न्या. रानडे व डॉ. भांडारकर यांच्या सहवासामूळे विठ्ठल शिंदे भारावून गेले. इ.स. १८९८मध्ये बी.ए. पूर्ण झाले.

**५) पुढील शिक्षणासाठी मुंबई :-** बी.ए. झाल्यानंतर इ.स. १८९९ मध्ये L.L.B. च्या शिक्षणासाठी ते मुंबईला गेले. ते प्रार्थना समाजाच्या उपासनेला नियमित उपस्थित राहत असत. पुढे ते प्रार्थना समाजाचे एकनिष्ठ सेवक बनले. डॉ. भांडारकरांच्या प्रयत्नामुळे विठ्ठल शिंदे इ.स. १९०१ ते १९०३ या कालखंडात शिक्षणासाठी इंग्लंडला गेले तेथे त्यांनी पालीभाषा व बौद्ध धर्मांचा अभ्यास व चिंतन केले . त्याच ठिकाणी त्यांनी विविध धर्माचा तौलनिक अभ्यास केला याच काळात ते स्कॉटलँड, फ्रान्स, जर्मनी, हालंड व इटाली या देशात गेले. सप्टेंबर १९०३ मध्ये आमस्टर गमला आंतरराष्ट्रीय उदारधर्म परिषद भरली या परिषदेला विठ्ठल रामजी शिंदे भारताचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित राहिले या परिषदेत त्यांनी "हिंदुस्थानातील उदारधर्म" हा निबंध वाचला ऑक्टोबर १९३० मध्ये ते भारतात परत आले.

## अ) सामाजिक कार्य

**प्रस्तावना :-** इंग्लंडहून परत आल्यानंतर विठ्ठल रामजी शिंदेनी प्रार्थना समाजाचे प्रचारक म्हणून कर्नाटक, ओरीसा, बंगाल, बिहार, मद्रास इ. प्रांतात प्रवेश केला. या कालखंडामध्ये त्यांनी भारतातील सामाजिक व धार्मीक जीवनाचे सुक्ष्म निरीक्षण केले. सर्व जाती धर्मामध्ये कमी अधिक प्रमाणात अस्पृश्यता पाळण्यात येते. हे त्यांच्या निर्देशनास आले. प्रांता प्रांतातील अस्पृश्य लोकांची दयनीय अवस्था पाहून त्यांचे मन हेलावून गेले. स्पर्श लोकाकडून अस्पृश्य लोकांवर होत असलेला अन्याय अत्याचार आणि अस्पृश्य लोकांना दिली जाणारी अपमानास्पद वागणुक अस्पृश्य लोक मुकाट्याने सहन करीत होते. याचाही प्रत्यय विठ्ठल रामजी शिंदे यांना आला.

लोकशिक्षण आणि समाज प्रबोधन यामुळे जातीभेद अस्पृश्यता व अंधश्रद्धा हे प्रश्न सुटू शकतील असे विठ्ठल शिंदेना वाटत होते. वऱ्हाड नागपूर, येथील अस्पृश्य लोकांनी "सोमवंशी हितचिंतक समाज" ही संस्था स्थापन केली होती. या संस्थेची शाखा नगर येथे स्थापन होणार होती. या कार्यक्रमाला विठ्ठल

विठ्ठल शिंदेचे लग्न ८ व्या वर्षी रुक्मीणी नावांच्या मुलीशी झाले. विवाहप्रसंगी तीचे वय ६ महिने होते. आईवडील वारकरी असल्याने शिंदेवर बालपणापासून वारकरी संप्रदायाचे संस्कार घडले. त्यामूळे ते सुद्धा वारकरी संप्रदायाच्या भक्तीत बालपणापासून रमले. इ.स. १८७७ मध्ये दुष्काळ पडला. लोक अन्न पाण्यासाठी रानावनात भटकत होते. त्या प्रसंगी शिंदे एका शिकाऱ्याला स्वत:चे जेवणाचे ताट देऊन टाकले. ४ वर्षे वयाच्या शिंदेने आपल्या कार्याची चुणुक दाखवली.

**२) शिक्षण :-** शिंदेचे प्राथमिक शिक्षण जमखिंडीत पूर्ण झाले. वयाच्या १२ व्या वर्षी इ.स. १८८५ मध्ये इंग्रजी हायस्कुलच्या पहिल्या वर्गात त्यांनी प्रवेश घेतला. इयत्ता २ रीत प्रथम क्रमांकाने पास झाले. व शिष्यवृत्ती प्राप्त केली. ही शिष्यवृत्ती इ.स. १८९१ पर्यंत म्हणते मॅट्रिकपर्यंत ची होती मॅट्रिक उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांना संस्थानाच्या शाळेत शिक्षकाची नोकरी मिळाली. ज्या शाळेत त्यांना शिक्षण घेतले तेथेच त्यांना शिक्षकाची नोकरी मिळाली पुढे आणखी शिक्षण घ्यावे अशी त्यांची इच्छा असल्याने त्यांनी नोकरीचा राजीनामा दिला. राजीनामा दिल्याने त्यांना संस्थानांच्या राजेसाहेबाच्या रोशाला सामोरे जावे लागले.

**३) पुणे येथील शिक्षण :-** स्कॉलरशिपमध्ये शैक्षणिक खर्च भागवणे कठीणहोते. परंतु तशाही परिस्थितीत त्यांनी शिक्षण सोडले नाही. विष्णु पंथ देशपांडे यांच्या मदतीने पहिल्या वर्षाची परिक्षा देऊ शकले इ.स. १८९३ ते १८९८ या काळांत विठ्ठल रामजी शिंदे यांनी फर्ग्युसन कॉलेजमध्ये शिक्षण घेतले. इंटर परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर संस्थानात नोकरी करण्याच्याअटीवर बडोद्याच्या सयाजीराव यांनी विठ्ठल रामजी शिंदे यांना दरमाह २५ रू. शिष्यवृत्ती सुरू केली.

**४) पुण्यातील वास्तव्य :-**पुणे येथे असताना विठ्ठल रामजी शिंदे यांच्या वाचनात मिल्स व मेकॉले यांचे साहित्य आले. त्यामूळे शिंदे हे नास्तिकवादाकडे वळले गेले. इ.स. १८९५ मध्ये पुणे येथे अखिल भारतीय राष्ट्रीय सभेचे अधिवेशन भरले तेंव्हा शिंद्यांनी स्वयंसेवक म्हणून काम केले. तेंव्हापासून ते राष्ट्रीय पक्षाकडे ओढले गेले. २५ में १८९८ मध्ये शिंदे पुण्यातील

# १०

# विठ्ठल रामजी शिंदे

**प्रस्तावना :-**

महाराष्ट्रात अनेक समाज सुधारक होऊन गेले त्यापैकी विठ्ठल रामजी शिंदे होत. म.फुले, शाहु महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर याप्रमाणेच विठ्ठल रामजी शिंदेनी दलितोद्धार आणि अस्पृश्यता निवारणाचा प्रयत्न केला. म. फुले, न्या.रानडे, शाहु महाराज, म. कर्वे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी, संत गाडगे महाराज, प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या मालिकेत शिंदेचे स्थान मोलाचे आहे.

**प्रारंभिक जीवन :-**

**१) जन्म :-** विठ्ठल रामजी शिंदेचा जन्म २३ एप्रिल १८७३ रोजी कर्नाटकात जमाखिंडीत झाला. त्यांचे वडील रामजी व आई यमुना कानडी भाषिक व वारकरी पंथाचे होते. त्यांच्या घरी ज्ञानेश्वर, तुकारामांच्या ग्रंथ व अंभंगाचे नित्य वाचन होत असे. त्यांचा परिवार जमखिंडीत प्रतिष्ठित होता. पण आर्थिकदृष्ट्या सक्षम नव्हता साधारणतः आर्थिक परिस्थिती असणाऱ्या कुटूंबात त्यांचा जन्म झाला. त्या काळात बालविवाहाची प्रथा प्रचलित होती. या प्रथेनुसार